सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय
# 'ए', रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२०.


दूरध्वनी क्र .०२२-२२०४१७०७

Website - www.glcmumbai.com Email - principal@glcmumbai.com


**शाविम/परीक्षा/२०२६-२७/8459** **दिनांक-१९/१०/२०२६**

## सूचना

**विषय : सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक **समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दिनांक २५ सप्टेंबर २०२६** अन्वये, सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, शासकीय विधी महाविद्यालयातील **शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांपैकी संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी** परीक्षा शुल्क माफीच्या लाभासाठी खालील Google Form मध्ये आवश्यक माहिती भरून संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत.

**Google Form लिंक : https://forms.gle/5Lyg45W8pDbzuJEP7**

**आवश्यक सूचना व अटी :**

१. विद्यार्थ्याचे गाव व तालुका शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये परीक्षा शुल्क भरलेले असणे आवश्यक आहे.

३. दुष्काळग्रस्त गाव व तालुक्याचा पुरावा म्हणून वैध रहिवासी प्रमाणपत्र/आधार कार्ड सादर करावे.

४. **बँक खात्याच्या तपशिलांसाठी विद्यार्थ्याने स्वतःच्या बँक पासबुकच्या पहिल्या पानाची स्पष्ट प्रत अपलोड करावी.** त्यावर विद्यार्थ्याचे नाव, बँकेचे नाव, खाते क्रमांक व IFSC कोड स्पष्ट दिसणे आवश्यक आहे.

५. परीक्षा शुल्काचा परतावा शासन निर्णयातील तरतुदी, विद्यार्थ्यांची पात्रता पडताळणी व सक्षम प्राधिकरणाच्या पुढील सूचनांनुसार करण्यात येईल.

६. Google Form भरून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **२६ ऑक्टोबर २०२६** आहे.

सर्व संबंधित पात्र ATKT विद्यार्थ्यांनी वरील सूचनांची नोंद घेऊन विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावा.

**Sd/-**
डॉ. अस्मिता वैद्य
प्राचार्य